*सन 2015.16 आणि*
*सन 2016.17 चे एमइएस व*
*एमआरएस, आययुएमएस*
*संगणक प्रणाली मधे नोंदी*
*करणेबाबत.*

## डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

## अर्थप्रशासन विभाग

---

## परिपत्रक

जा.क.अप्रवि / लेखा / 2018 / 2653 दिनांकः 18.03.2018

**विषयः— IUMS संगणक प्रणालीमधे जमा खर्चाची माहिती अद्यावत करणे बाबत.**

महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम 1983 च्या कलम 18 (11) 31 VIII आणि 55 नुसार लेखे तयार करणे बंधनकारक असल्याने सन 2015.16 व सन 2016.17 चे वार्षिक लेखा सादर करणेबाबत निर्देश दिले आहेत. विद्यापीठांतर्गत विविध विभागातील सन 2015.16 आणि सन 2016.17 चे मासिक खर्च, मासिक उत्पन्न, ऋणशिर्ष इ. तपशिल बाबतच्या नोंदी आययुएमएस संगणक प्रणाली मधे घेणे आवश्यक आहे.

संगणक प्रणालीमध्ये अद्यापपर्यत ज्या विभागाने अद्ययावत नोंदी केल्या नसतील त्या करणे अनिवार्य राहील. ज्या विभागांनी संगणक प्रणाली मधे मासिक खर्च, मासिक उत्पन्न, ऋणशिर्ष याबाबत नोंदी केल्या नसलेचे निदर्शनास आल्यास **त्यांचे देयके पारीत होणार नाहीत याची नोंद घ्यावी.**

आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचित करणेत येते की, त्यांनी त्यांचे अधिनस्थ असलेले कर्मचारी यांचेकडून वरील आवश्यक नोंदी यथाशिघ्र पूर्ण कराव्यात व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा, जेणेकरुन देयके पारित करणेस अडचण निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. विद्यापीठाचे लेखे विहीत कालमर्यादेत शासनास सादर करणे आवश्यक आहे. तसेच अधिकारी / कर्मचारी उपलब्ध नसल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. संगणक प्रणालीमधे एमईएस व एमआरएस तयार केल्यावर त्याची एक प्रत वेतन व लेखा अधिकारी, अकोला कार्यालयास उपलब्ध करून देण्यात यावी. याबाबतचा अहवाल 25 / 03 / 2018 पर्यंत विनाविलंब सादर करण्यात यावा.

उपरोक्त सुचनांचे काटेकोरपणे अनुपालन करावे.

नियंत्रक
डॉ.पंजाबराव देशमुख
कृषि विद्यापीठ, अकोला.

प्रतिलीपी सादरः

1. नियंत्रक अधिकारी / विभागप्रमुख / आहरण व संवितरण अधिकारी(सर्व).
2. मा.कुलसचिव, डॉ.पंदेकृवि, अकोला यांना माहितीकरीता सविनय सादर.
3. कुलगुरुंचे तांत्रिक सचिव यांना मा.कुलगुरु डॉ.पंदेकृवि, अकोला यांचे माहितीकरीता सविनय सादर.